**<u>असुधारित प्रत</u>**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल, २०१७

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**(गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**श्री.सुजितसिंह ठाकूर,** डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)** -

"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पीक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी

करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे —**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "**ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांचे स्वीय सहायक व बीट मुकादम यांना लाच घेताना केलेली अटक**" या विषयावरील सर्वश्री. नागोराव गाणार, हेमंत टकले, सतिश चव्हाण, वि.प.स व सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, संदिप बाजोरिया व प्रकाश बिनसाळे, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ४१६७३ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

**(१) वित्त व नियोजन मंत्री** : **(क)** "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे (१) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल व (२) आर्थिक क्षेत्रावरील अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा सार्वजनिक उपक्रम अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (२) | **शालेय शिक्षण व क्रिडा आणि अल्पसंख्याक विकास मंत्री** | : | **(क)** | "महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) (दुसरी सुधारणा) नियमावली, २०१७ अधिसूचना क्रमांक एमईपी. २०१५ / प्र.क्र.३२५ / टीएनटी-१. दिनांकित १५ मार्च, २०१७" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **जलसंपदा मंत्री** | : | | "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल आणि अलग लेखापरीक्षा अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (४) | **उद्योग मंत्री** | : | | "महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (५) | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | : | **(क)** | "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | **(ख)** | "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा अकरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : "लोकलेखा समितीचा एकोणिसावा व विसावा अहवाल सभागृहास सादर करणे."**

**चार : विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवणे —**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** | : | **"महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचे दायित्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |
| (२) | **श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** | : | **"परजना, ता.नेर,जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** | : | **"मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी कोर्टातील दिवाणी वाटपाची नोंदणी करणेबाबत काढलेले चुकीचे आदेश रद्द करणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |
| (४) | **श्री. रामहरी रूपनवर, वि.प.स.** | : | **"राज्यात अन्न, फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता असणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |
| (५) | **श्री. हरिसिंग राठोड, वि.प.स.** | : | **"राज्यातील जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचा-यांच्या वेतन ग्रेड-पे दुरुस्ती व इतर प्रलंबित मागण्या मंजूर करणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |
| (६) | **श्री. संजय दत्त, वि.प.स.** | : | **"भारतात आयात केली जाणारी औषधे, प्रसाधने किंवा त्यांच्या मालाच्या नमुन्यांची चाचणी करण्यासाठी अधिकृत मानल्या गेलेल्या प्रयोगशाळेत पात्र शास्त्रज्ञांच्या अनुपस्थित तोतया शास्त्रज्ञाव्दारे चाचण्या केल्या जात असल्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील. |

(७) **श्री. संजय दत्त, वि.प.स.** : **"मुंबईतील वांद्रे येथील लीलावती, मुलुंड येथील फोर्टीस, अंधेरीचे कोकिलाबेन अंबानी, परळचे ग्लोबल, पवईमधील हिरानंदानी आणि गिरगावातील सर एच. एन रूग्णालय वैद्यकीय उपकारणांवरील छापील किंमतीपेक्षा अधिक किंमत रूग्णांकडून उकळून रूग्णांची पिळवणूक करीत असल्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

(८) **श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.** : **"लातूर जिल्हयातील मांजरा व रेणा नदीवरील बॅरेजेसच्या देखभाल व दुरूस्तीसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**पाच : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने – (असल्यास).**

**सहा : (क) लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) – [अनुक्रमांक – (१) ते (३)] –**

(१) **सर्वश्री. संजय दत्त,** शरद रणपिसे, हेमंत टकले, सुनिल तटकरे, नारायण राणे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नवी मुंबई मधील खारघर येथे दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञान व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घटना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ.उदय निरगुडकर, साप्ताहिक राजसत्ताचे संपादक वसंत माने, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सुर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भारती

आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टि.व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यानुसार काम करु न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावी अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत ही गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षापासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा.मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकांरावरील होणारे हल्ले रोखण्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात येईल, पेन्शन आणि घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन देणे, परंतू दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरु करावी अशा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असताना त्यांच्या सुरक्षितेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. अमरसिंह पंडित,** सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषि मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होवू नये म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यावरण नियम व कायद्यानुसार प्रत्येक बीटी कॉटन बियाणांच्या ४५० ग्रॅम पिशवी सोबत १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणे विक्री करणे बंधनकारक असणे, कायदा आणि नियम

धाब्यावर बसवुन राज्यात बीटी बियाणांसोबत नॉन बीटी ऐवजी १२० ग्रॅम बीटी बियाणांची विक्री करण्यात येणे, यामुळे राज्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, बीटी बियाणांसोबत दिल्या जाणाऱ्या १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणांची तपासणी नुकतीच नंदूरबार येथे शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर करण्यात येणे, तपासणीमध्ये हे बियाणे बीटी बियाणे असल्याचे सिध्द होणे, या संदर्भात दाखल तक्रारीवरुन राज्यात कृषी अधिकाऱ्यांनी बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, या बाबतच्या तक्रारी आणि त्यावरील अपीले मोठया प्रमाणावर प्रलंबित ठेवून अधिकारी आणि कंपनी यांच्या आर्थिक संगनमताने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, अनेक ठिकाणी बियाणांप्रमाणे बोगस रासायनिक खते विक्रीचेही प्रकार उघडकीस येणे, नुकतीच हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या दबावापोटी खताचा नमुना प्रयोगशाळेत तपासला असता त्यामध्ये माती असल्याचे सिध्द होणे, अधिकाऱ्यांकडून या बाबत कारवाई होत नसल्यामुळे बोगस आणि बनावट खत विक्रीला चालना मिळणे, बायो पेस्टीसाईड्सच्या नावाखाली शेतकऱ्यांची मोठया प्रमाणावर फसवणूक करुन चायनामेड बोगस औषधांची विक्री मोठया प्रमाणावर होत असणे, जैविक औषधांच्या नावाखाली रासायनिक किटकनाशकांची विक्री मोठया प्रमाणावर राज्यभर होत असणे, बुटीवार जि.नागपूर येथे याबाबत नुकताच गुन्हा दाखल होणे, प्रकरणातील दोषींविरुध्द कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या विक्रीवर निर्बंध आणुन यासंदर्भात कडक कायदा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधुन करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया."

**(३)** **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये

तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे, काही वर्षापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडी किनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरु केली असणे, डॉक्टर बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरामध्ये नव्या इमारती उभ्या राहाणे, त्याचप्रमाणे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची पुनर्बांधणी केली जाणे, इमारत पूर्ण होण्यापूर्वी भोगवाटा पत्र विकासकाकडून प्राप्त करणे आवश्यक असणे, तथापी बहुसंख्य इमारतींमध्ये सदर नियमांचे पालन न होणे, यावर गेल्या वर्षी मुंबई न्यायालयाने काही महापालिका अभियंत्यावर एफ.आय.आर. दाखल करण्याचे निर्देश देणे, यामुळे इतर वार्डमधील संबंधित मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अशा रहिवाशांना जागा खाली करण्याचे आदेश बजावणे, संबंधित विकासकांनी रहिवाशांची भाडी मध्येच बंद करणे, अशा रहिवाशांना बेघर होण्याची पाळी येणे, यामध्ये ना विकासक ना पालिका अधिकारी यांच्यावर कारवाई होणे, उलट रहिवाशांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागणे, मुंबईतील असंख्य नव्या इमारतींमधून सदर प्रश्न उपस्थित झाल्याने त्यास गंभीर स्वरुप येणे, यामुळे शासनाबदल जनतेत पसरलेला रोष व नाराजी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ब्रिटीश कालीन सायबाच्या धरणाची सध्या मोठया प्रमाणात जीर्णावस्था झालेली असून या धरणातून वारंवार पाणी गळती सुरु होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, नगरपरिषदेकडून वारंवार दुरुस्ती होत असून पाणी गळती थांबलेली

नसणे, नगरपरिषदेने या धरणाचे स्ट्रक्चरल ऑडिट केले असता दुरुस्ती शक्य नसल्याचा अहवाल येणे, धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असणे, त्यामुळे अतिवृष्टीने पाण्याच्या प्रवाहामुळे धरण फुटल्यास राजापुर शहराच्या बाजार पेठेत पुराचे पाणी जाऊन मोठे आर्थिक नुकसान व जिवित हानी होण्याची शक्यता निर्माण होणे, दुर्घटनेमुळे शहराला होणारा धोका टाळण्यासाठी तसेच राजापूर शहराला पाणी पुरवठा होण्यासाठी या ब्रिटीशकालीन सायबाच्या धरणाला पर्यायी नविन धरण बांधण्याची होत असलेली मागणी, या मागणीनुसार धरणानजीक नवीन धरणासाठी जागा उपलब्ध असूनही कार्यवाहीसाठी होत असलेला विलंब, शासनाने तातडीने नविन धरण बांधण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री. गिरीशचंद्र व्यास,** प्रा. अनिल सोले, सर्वश्री. नागोराव गाणार, परिणय फुके, श्रीमती स्मिता वाघ, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील "अ" वर्ग महानगरपालिका अस्तित्वात असून त्यांचे सेवाशर्तीकरिता विशिष्ट अधिनियम असणे, मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिका एकाच अधिनियमाच्या कक्षेत येत असल्याने त्यात काम करणारे कर्मचारी / अधिकारी सेवेत दाखल झाल्यापासून त्या त्या महानगरपालिकेत निवृत्त होत असणे, दोषी कर्मचारी / अधिकाऱ्यांविरुध्द प्रशासकीय कारवाई म्हणून बदली करता येत नसल्याकारणास्तव सेवेतून काढण्याखेरीज आयुक्तांना पर्याय देखील उपलब्ध नसणे व राजकीय दबावापोटी असे प्रस्ताव देखील महासभेतच नामंजूर होत असणे, वर्षानुवर्षे एकाच महानगरपालिकेत काम केल्यामुळे ठराविक अधिकारी / कर्मचारी यांचा प्रशासनावर पूर्णपणे ताबा होऊन गैरकामांना गती मिळत असणे, त्यातच मोठमोठ्या उद्योजकांशी हितसंबंध वाढल्याने गैरमार्गाने बेहिशोबी मालमत्ता वाढण्यास देखील मदत होत असून अधिकाऱ्यांची मुजोरीदेखील वाढत असल्याची निदर्शनास आलेली बाब, त्यामुळे या भ्रष्टाचारास प्रतिबंध करताना शासनास येत असलेले अपयश, त्यामुळे "अ" वर्ग महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांची अन्य महानगरपालिकांमध्ये समकक्ष पदावर बदली करण्याबाबतची तरतूद करुन ती तात्काळ अंमलात आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

(७) **श्री. रामनिवास सिंह, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील पवई येथील हिरानंदानी, स्वामीनारायण मंदिर ते कैलाश कॉम्पलेक्स येथील सुरु असलेल्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता, गैरप्रकार, व निकृष्ट दर्जाचे काम सुरु असल्याचे नुकतेच माहे मार्च, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू रस्त्याचे काँक्रिटीकरण महापालिकेच्या सेंट्रल एजन्सीद्वारे करण्यात येणार असून त्याकरिता सुमारे ९ कोटी ६२ लाख १३ हजार इतका खर्च होणार असून सदर कामाकरिता दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी मंजूरी मिळाल्यानंतर मे.प्राईम सिव्हील इन्फ्रास्ट्रचर प्रा.लि. यांना सदर रस्त्याचे काँक्रिटीकरणाचे कंत्राट देण्यात येणे, त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम देखील सुरु होते परंतु रस्त्याच्या पूर्व दिशेला रस्त्यामध्ये अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण होत असल्याचे निदर्शनास येणे, स्थानिक नागरिकांना काँक्रिटीकरणाचे काम सुरु असल्याचे भासवून कंत्राटदार महापालिका, शासन तसेच नागरिकांची करित असलेली फसवणूक, अर्ध काँक्रिटीकरण व अर्ध डांबरीकरण केल्यामुळे रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होऊन येत्या पावसाळयात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडल्याची निर्माण झालेली भिती, परिणामी या रस्त्यांवर अपघातामध्ये वाढ होण्याची शक्यता, सदर प्रकरणी वेळीच होत असलेल्या निकृष्ट कामाला आळा बसावा याकरिता सदर कामाची तातडीने सखोल चौकशी करावी व दोषी कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

(८) **प्रा. जोगेन्द्र कवाडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सिंधु एज्युकेशन सोसायटी, नागपूर या संस्थेद्वारा संचलित महात्मा गांधी शाळा जरीपटका, नागपूरचे अध्यक्ष श्रीमती विणी बजाज आणि सचिव दिपक बजाज यांचेवर भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग नागपूरने दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी धाड टाकून प्रचंड प्रमाणात बेहिशोबी रक्कम जप्त करणे, श्री. दिपक बजाज यांना नोव्हेंबर, २०१५ मध्ये अटक करुन कारागृहात ठेवले असणे, विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळखंडोबा केल्याचा गंभीर गुन्हा असल्याने मा.उच्च न्यायालय व मा.सर्वोच्च न्यायालयात वारंवार जामिन प्राप्तीसाठी केलेले अर्ज फेटाळण्यात येणे, राज्य शासनाने या आरोपींची संपत्ती जप्त करण्याची परवानगी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग, नागपूर यांस दिली

असूनही भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने जप्तीची कारवाई न करणे, शिक्षण विभागाच्या संगनमताने केलेला भ्रष्टाचार, विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाबाबत श्री. दिपक बजाज यांची मुलगी श्रीमती दिप्ती बजाज यांचेवर ए.सी.बी. ने पुरवणी आरोपपत्र दाखल करुन देखील त्यांचेवर कारवाई न करणे, एवढे भ्रष्टाचार करणाऱ्या सिंधु एज्युकेशन सोसायटी विरुध्द धर्मादाय आयुक्त नागपूरने कोणतीही दखलपात्र कारवाई न करणे, सिंधु एज्युकेशन सोसायटीद्वारा केलेला व करण्यात येणाऱ्या भ्रष्टाचारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने प्रशासकांची नियुक्ती न करणे, या सर्व कारवाईस होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** धनंजय मुंडे, अॅड. निरंजन डावखरे, सर्वश्री. बाळाराम पाटील, नरेंद्र पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रोहा हे रायगड जिल्ह्यातील एक प्रमुख शहर असणे, गतवर्षीच रोहा-अष्टमी नगरपरिषदेने आपला शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा केलेला असणे, रोहा-अष्टमी शहराला सांस्कृतीक व ऐतिहासिक वारसा असणे, पर्यटन व औद्योगिकदृष्टया हे शहर विकसित होत असणे, वाढत्या लोकसंखेला रोहा-अष्टमी नगरपरिषद योग्य सोई सुविधा देत असणे, याच बरोबर शहरात सांस्कृतिक व पर्यटन वाढण्यासाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न करण्यात येत असणे, याचधर्तीवर रोहा शहरात प्राचीन असलेल्या अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचे सुशोभिकरण करुन त्यावर पर्यटन व्यवसाय वाढीसाठी नगरपरिषदेमार्फत प्रयत्न सुरु असणे, यासाठी शासनाकडून वैशिष्टयपूर्ण बाबीसाठी मंजूर असलेले अनुदान गेल्या दोन वर्षापासून उपलब्ध असणे, मात्र जिल्हा प्रशासन या प्रकल्पाच्या मंजूरी विषयी उदासिन असणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदे मार्फत तलावाचे सुशोभिकरण, संरक्षक भिंत , बाग-बगीचा करणे, मिनी ट्रेन, बोटींग क्लब, विक्रेते स्टॉल आदी प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेले असणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार या प्रस्तावास मंजुरी मिळणे विषयी विनंती केलेली असणे, जिल्हा प्रशासाने मात्र वेळोवेळी त्यामध्ये त्रुटी काढून प्रस्ताव मंजूरीमध्ये उदासिनता दाखविणे, रोहा-अष्टमी नगरपरिषद शतकोत्तर सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना त्याच वर्षी या प्रकल्पाची सुरुवात व्हावी अशी स्थानिक नागरीकांची इच्छा असणे, तद्नंतर प्रशासनाने प्रस्तावात बदल करुन नव्याने

सविस्तर प्रस्ताव सादर करण्याविषयी नगरपरिषदेस सुचित करणे, यामध्ये वेळेचा अपव्यय झालेला असणे, शासनामार्फत निधी उपलब्ध झालेला असताना सुध्दा केवळ तांत्रिक बाबींमुळे हा प्रकल्प मंजूरी साठी रखडलेला असणे, म्हसळा नगरपंचायतीस नगरोत्थान कार्यक्रमा अंतर्गत या वर्षी एक कोटी पंच्याहत्तर लाख इतका निधी उपलब्ध झालेला असणे,सदर निधीचा जिल्हा प्रशासनाच्या उदासिन धोरणामुळे अद्याप विनियोग झालेला नसणे, रोहा-अष्टमी नगरपरिषदेने नव्याने अहिल्यादेवी पुष्कर्णी तलावाचा रु. एक कोटी बत्तीस लाख रकमेचा सविस्तर प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडे सादर केलेला असणे, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने या प्रकल्पास त्वरीत मंजूरी देऊन प्रकल्प सुरु करण्याची स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधी कडून होत असलेली मागणी, गेल्या वर्षभरापासून प्रकल्प मंजूर न झाल्याने स्थानिक नागरीकांमध्ये पसरलेले नाराजीचे वातावरण, प्रकल्पास त्वरीत मंजूरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री. दत्तात्रय सावंत,** श्रीकांत देशपांडे, विक्रम काळे, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, श्री. अमरनाथ राजूरकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात गेल्या १५ वर्षापासून विना अनुदानित तत्वावर सुरु असलेल्या शाळा व वर्ग तुकड्यांवर सुमारे ३०,००० शिक्षक कार्यरत असणे, या शाळा व वर्ग तुकड्या दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात येणे, राज्यात दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ च्या शासन आदेशाने सुमारे १९,२४७ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागणे, त्यामुळे या शिक्षकांच्या मनात शासनाविषयी आनंदाचे वातावरण निर्माण होणे, असे असताना सदर शिक्षकांना वेतन देत असताना दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र झालेल्या शाळांचा समावेश न करणे, त्यामुळे सदर शिक्षकांना आजही विना वेतन काम करावे लागत असणे, तसेच मंत्रालय स्तरावर विविध क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून आलेल्या शाळा व वर्ग तुकड्या अनुदानास पात्र होण्याच्या प्रतीक्षेत असणे, सदर शाळा व वर्ग तुकड्या घोषित करण्यासाठी अर्थ विभागाच्या परवानगीची प्रतीक्षा करावी लागणे, सदर फाईल अर्थ विभाग, नियोजन विभाग, शिक्षण विभाग अशी मंत्रालयात वारंवार फिरत असणे, त्यामुळे या

शिक्षकांच्या मनामध्ये शासनाविषयी असंतोषाचे वातावरण पसरणे, दिनांक १ जुलै, २०१६ व दिनांक २ जुलै, २०१६ रोजी पात्र झालेल्या शाळा सहित निधी मंजूर करण्याबाबत शिक्षक संघटनाकडून वारंवार मागणी करण्यात येणे, गेली १५ वर्षे विना वेतन कार्य करीत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका."

(११) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महिला व बाल विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार नव्या बाल न्याय अधिनियमानुसार राज्य शासनाने काराची नियमावली ग्राह्य मानून राज्याने दत्तक विधानासंदर्भात राज्याला सुकर होतील अशी प्रक्रिया करणे अपेक्षित असणे, तथापि दत्तक घेतली जाणारी मुले ही वस्तू नसून व्यक्ती आहेत, त्यांचे ऑनलाईन प्रक्रियेद्वारा वस्तुकरण होता कामा नये, ही दत्तक विधान क्षेत्रातील विविध सामाजिक संस्थांची मागणी "कारा" ने जाहीर केलेल्या नव्या नियमावलीमध्ये धुडकावून लावली असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, मुलाला देशात वा देशाबाहेर दत्तक जाण्याची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रितसर दत्तक नोंदणी करणे अपेक्षित असणे, तथापि नव्या नियमावलीमध्ये उपरोक्त अवधित सुकर सुविधा देण्यात न येणे, सदर महिन्यांच्या निरिक्षणानंतर बालकांच्या दत्तक विधानाचा स्थायी आदेश होणे, तसेच परदेशात मूल पाठविल्यानंतर जर ते त्या वातावरणात रमले नाही किंवा पालकांकडून योग्य वागणूक मिळत नसेल तर त्याला भारतात पुन्हा येण्याची सुकर सुविधा नव्या नियमावलीमध्ये नसणे, त्यामुळे स्वत: च्या भावना व्यक्त करण्यास असमर्थ असलेल्या लहान मुलांचे काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहणे, मुल दत्तक दिल्यानंतर यासंदर्भात सामाजिक संस्थांचा सहभाग नव्या नियमावलीतून काढून टाकण्यात येणे, तसेच नव्या घरात मुल रमले नाही, आजारी पडले तर मुलाला कशाप्रकारे समजून घ्यावे याबाबतची माहिती नव्या नियमावलीत नसणे, त्यामुळे दिनांक १७ जानेवारी, २०१७ पासून लागू झालेल्या या नियमावलीमध्ये राज्यातील मुलांच्या गरजांचा विचार करून महत्वाचे बदल करण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाच्या उपाययोजना, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(१२) **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक

महत्त्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील राज्य परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांकरिता दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून नवीन कामगार करार लागू करण्यात येणे, एस.टी. कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करावा, राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना शासनामध्ये विलिनीकरण करण्यात यावे, सद्य:स्थितीत सरळ सेवेअंतर्गत भरती झालेल्या वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत रुपये १५० इतके मानधन दिले जाते तर अधिकाऱ्यांना मुळ वेतनाइतके मानधन देण्यात येत असणे, त्यामुळे सेवापूर्व प्रशिक्षण कालावधीत अधिकाऱ्यांप्रमाणेच वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाइतके मानधन देण्यात यावे, इ. अन्य मागण्या मान्य करण्याबाबत विविध कामगार संघटनांनी शासनाकडे लेखी निवेदन माहे जानेवारी, २०१७ व त्यासुमारास सादर करणे, परंतु त्यानुषंगाने अद्यापि कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी राज्य परिवहन सेवेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरणे, त्यामुळे संघटनांनी सादर केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(१३)** **सर्वश्री. धनंजय मुंडे,** सतिश चव्हाण, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, हेमंत टकले, सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्राच्या २२ सिमा तपासणी नाक्याचे आधुनिकीकरण व संगणकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतलेला असणे, यात सिमा तपासणी नाक्यांवर विहीत कायदे तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे विहीत मर्यादेपेक्षा अधिक वजनाच्या माल वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करणे, अतिरिक्त भाराप्रमाणे ठरवून दिलेले दंड व शुल्क आकारणे, अतिरिक्त वजनाच्या मालाचे अनलोडींग / लोडींग करणे यासारख्या बाबी अंतर्गत असणे, या संदर्भात लोडींग, अनलोडींग, साठवणूक सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी एम.बी.सी.पी.एन.एल सोबत सवलत करारनामा करण्यात आलेला असणे, त्याकरिता आकारावयाचे विहीत शुल्क निर्धारीत केलेले असणे, तथापि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अतिरिक्त भाराच्या वाहनांवर कारवाई न केल्यामुळे या प्रकरणी कंपनीचे शुल्कापोटी गत दोन ते तीन वर्षात ६४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याबाबत तसेच असे शुल्क शासनास प्राप्त व्हावयाच्या दंड

आकरणीच्या मानाने अत्यल्प असल्याने शासनाच्या महसूलाची सुमारे २००० ते ३००० कोटी रुपयांची हानी झालेली असल्याबाबतचा अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी परिवहन विभागात सादर केलेला असणे, या प्रकरणी हजारो कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत येण्याऐवजी परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या खिशात जाऊन हजारो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असल्याची शक्यता, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **श्री. चंदूभाई पटेल, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषि मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मे. पटेल नारायणदास फर्टीलायझर प्रा.लि., जळगाव या कंपनीने रासायनिक खतांची (सिंगल सुपर फॉस्पेट) खोटे दस्तऐवज व बिल तयार करुन अनेक वर्षापासून शासनाकडून करोडो रुपयांचे अनुदानाची रक्कम घेवून शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास येणे, यासंदर्भात महाराष्ट्रातील लातूर-उस्मानाबाद-माजलगांव, बीड, केज, पाटोदा, मंगळूरपीर, धामणगांवरेल्वे, अमरावती, संगमनेर, जळगाव, मालेगांव या निरनिराळया गावात व शहरात कृषी निरिक्षक व संबधित अधिकारी यांनी गुन्हे दाखल केलेले असणे, सर्वसामान्य नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरणे, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करुन कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व संबंधित कंपनीकडून शासनाच्या झालेल्या फसवणूकी प्रकरणी घेण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(१५) **श्री.नारायण राणे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई – पुणे एक्सप्रेस-वेच्या लगत असलेल्या महाराष्ट्र विकास रस्ते महामंडळाच्या मालकीच्या सुमारे आठ सुविधा भूखंडांच्या वाटपामध्ये व निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या घोटाळ्यामुळे शासनाचे २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे झालेले नुकसान, सहा विविध कंपन्यांनी सुविधा भूखंडांसाठी दिलेल्या २००० कोटी रुपयांच्या मंडळासाठी फायदेशीर निविदा २०१५ सालामध्ये साधारण कारणाविना रद्द करण्याचा झालेला प्रकार, दुसरीकडे केवळ १० कोटी ४१ लाख रुपयांमध्ये ९.५० हेक्टरचे दोन भूखंड ट्रक टर्मिनसकरीता

३० वर्षाच्या मुदतीने निवेदेच्या अटी पायदळी तुडवून ठेकेदाराच्या नावे वर्ग करण्याचा झालेला गैरप्रकार, ट्रक टर्मिनससाठी वाटप केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचा वाटप ठेकेदाराकडून होत असल्याचा व अनामत रक्कमा मुदत संपल्यानंतरही जमा केल्या नसल्याने महामंडळाकडून झालेला कानाडोळा, शासनाच्या विविध स्तरांवर तक्रारी केल्यानंतरही आणि महालेखापालांनी आक्षेप घेऊनही याप्रकरणी ठोस कठोर कारवाई करण्याकडे शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष, याबाबत राज्यशासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१६) **सर्वश्री. प्रकाश गजभिये,** संजय दत्त, नारायण राणे, शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. चंद्रकांत रघुवंशी, आनंदराव पाटील, अमरनाथ राजूरकर, ॲड. जयदेव गायकवाड, श्री. जयवंतराव जाधव, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील दादर येथील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होऊन दोन वर्ष उलटून गेली तरी अजून मिलची जमीन राज्य सरकारच्या ताब्यात आली नसणे, इंदू मिल जमीनच्या हस्तांतरणचा प्रश्न प्रलंबित असणे, सदरील जमीन राज्य शासनाच्या ताब्यात नसल्याने या जमीनीवर कोणतेच बांधकाम व इतर कामे होणार नसणे, राज्यशासनाने सदरील जागा ताब्यात न घेता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिल येथे भुमिपजून केल्याच्या घटनेमुळे आंबेडकर प्रेमी जनता व सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करणारी असल्याने राज्यशासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची भावना निर्माण होणे, राज्यशासनाने इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या स्मारकासाठी ताब्यात घेऊन प्रस्तावित आंतरराष्ट्रीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(१७) **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"यवतमाळ जिल्ह्यातील काळ्या जमिनीत लांब पल्ल्याचा कापूस तयार करण्याची क्षमता असणे, त्यामुळे अनेक देशात जिल्ह्याचा कापूस जात असणे, परिणामी कापसाचे माहेरघर पांढऱ्या हिऱ्याचा जिल्हा, कॉटनसिटी बिरुदाबली जिल्ह्याला प्राप्त होणे, तसेच

जिल्ह्यात सहकारी तत्वावर २४ जिनिंग आणि प्रेसिंग सहकारी संस्था आहेत मात्र यातील काही व ठिकाणी जिनिंग तर काही ठिकाणी प्रेसिंगची व्यवस्था असणे त्याच सोबत जिल्हयात कापसाचे उत्पादन सर्वाधिक होत असल्याने शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव मिळावा जिनिंग व प्रेसिंगची कामे एकत्र व्हावीत म्हणून जिल्ह्यात टेक्स्टाईल झोन उभारण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(ख) **लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे –**

**मुख्यमंत्री** : "**नागपूर येथील मिहान सेझ प्रकल्पातील २३० एकर जमिनीबाबत**" या विषयावरील श्री. शरद रणपिसे व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती" सभागृहासमोर ठेवतील.

(ग) **लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे - (जोडपत्र पहावे.)**

**सात : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास).**

# - मध्यंतर -

**आठ : शासकीय विधेयके -**

(क) **विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ

पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.
(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.
(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.
(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(९) ॲड.अनिल परब, वि.प.स.
(१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे,**

**वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(४) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १७ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.ए
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(५) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) महसूल मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री
(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(७) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी**

**(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० – भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(८) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ – शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ – शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(९) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) सहकार मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(१०) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**
**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) सहकार मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.नारायण राणे, वि.प.स. | (४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(११) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १९ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**(१२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २० – भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २० – भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) मुख्यमंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(१३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४ – महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४ – महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) संसदीय कार्य मंत्री | (२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी |

पक्षनेता, विधानपरिषद

(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.
(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(१४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २७ – संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर विधेयक, २०१७"**

**(१५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २८ – महाराष्ट्र परिवहन व रस्ते सुरक्षा विधेयक, २०१७"**

---

**(ख) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३१ – महाराष्ट्र शेतजमीन पट्टयाने देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३२ – महाराष्ट्र प्रसारमाध्यमातील व्यक्ती आणि प्रसारमाध्यम संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेचे नुकसान किंवा हानी यांना प्रतिबंध) विधेयक, २०१७"**

---

**नऊ : (गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) –** **सर्वश्री. धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, संजय दत्त, जयंत पाटील, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, सतिश चव्हाण, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदूरकर, सर्वश्री. जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्रानी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, राहुल नार्वेकर, हरिसिंग राठोड, रामराव वडकुते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, जयदेव गायकवाड, अनिल तटकरे, **वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू व**

**मंत्र्यांचे उत्तर) - (म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - "दहा (क)" सोबत एकत्रित चर्चा** ) -

"कर्जबाजारीपणा, नापिकी, शेतमालाला मिळत नसलेले भाव, अस्मानी संकटे, शेतीविषयक बदलणारी नेहमीची धोरणे, व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक यामुळे राज्यातील शेतकरी त्रस्त असणे, नोटाबंदीच्या निर्णयामुळे कृषी मालाचे भाव कोसळून शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान, या सातत्याने येणाऱ्या संकटामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असणे, मागील ३ वर्षात ९ हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, आत्महत्यांचे हे सत्र अद्यापही सुरूच असणे, जिल्हा बँकांवर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला सुरुंग लागणे, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याकडे दुर्लक्ष होणे, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर, धान, कांदा, टोमॅटो, सोयाबिन, भाजीपाला तसेच संत्रा, केळी उत्पादक शेतकरी कोलमडणे, कडधान्याच्या उत्पादनात विक्रमी वाढ होऊनही गेल्या पाच वर्षातील निच्चांकी भाव शेतकऱ्यांना मिळणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरू असलेली खरेदी, निर्यात बंदीसारखे हत्यार उपसून कांदा उत्पादकाची केलेली कोंडी, हवामान आधारीत फळ पिक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्याने हजारो शेतकरी पिक विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, कोरडवाहू शेती अभियानांच्या आर्थिक तरतूदीत ८० टक्क्यांवरुन अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, कृषि विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला बॅकलॉग परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यात येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने नाफेड करुन उडीद, तूर खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी दर पाडणे, मार्च महिन्यांतील अवकाळी पावसामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे व नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नसणे, चारही बाजूने कोंडी होत असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अंवलबविलेला असणे, शेतकऱ्यांना या कठीण प्रसंगात आधार देण्यासाठी कर्जमाफीचा उपाय असतांना सरकारकडून सातत्याने कर्जमाफीस नकार देण्यात येत असणे, महाराष्ट्र शेजारील आंध्रप्रदेश या राज्याने ७ हजार ९०० कोटी रुपयांचे, तेलंगणा राज्याने १७ हजार कोटींचे, तामिळनाडू राज्याने ५ हजार ७८० कोटी रुपयांचे तर उत्तर प्रदेश राज्याने ३६ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांकडील कर्ज माफ करणे, याच पार्श्वभूमीवर राज्यातही कर्जमाफीची सातत्याने होणारी मागणी, याच मागणीकरीता सर्व विरोधी पक्षांच्यावतीने दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल, २०१७

या कालावधीत चांदा ते बांदा दरम्यान काढण्यात आलेली संघर्ष यात्रा सदरच्या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संपूर्ण कर्जमाफीची केलेली मागणी, याकडे शासनाने झालेले अक्षम्य दुर्लक्ष, आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : (गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — [अनुक्रमांक — (क) ते (घ)] —**

**(क) सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, जनार्दन चांदुरकर, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, अनिल तटकरे, आनंदराव पाटील, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावासोबत एकत्रित चर्चा** ) -

"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षात ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून आत्महत्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले, यावर्षी तूरीचे विक्रमी उत्पादन होणे, शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तूरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तूर खरेदी करण्याचा निर्णय घेणे, मात्र तूर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन

करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तूर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तूर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीची वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तूर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरीसुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेतीमालाला बोनस देण्याचे धोरण स्वीकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ख)** **सर्वश्री शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरसिंह पंडित, जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्यात झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, शहरीकरण वाढत असताना त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका यांच्यावर पडत असलेला ताण, नविन शहरीकरण होत असल्यामुळे त्याठिकाणी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणीपुरवठा करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्था असमर्थ असणे, शहरीकरण वाढत असले तरी महानगरपालिकांना राज्य शासन पुरेसा निधी देत नसणे, त्यातच एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिका व राज्य शासन आर्थिक अडचणीत असणे,

यापूर्वी केंद्रातील युपीए शासनाने शहरी विकासासाठी अनेक आणलेल्या योजना राज्यशासनाने बंद करणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरोत्थान योजना बंद करुन स्मार्ट सिटी योजना आणणे, परंतु त्यासाठी निधींची भरीव तरतूद नसणे, तसेच अद्यापही स्मार्ट सिटीबाबतचे प्रकल्प अहवाल तयार नसणे, नागरी क्षेत्रात पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस उग्ररुप धारण करीत असणे, मुंबईतील ४ लाख झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही याबाबत झोपडपट्टीधारकांना घरे उपलब्ध करुन न देणे, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधलेल्या ३५ हजार सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र न मिळणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटई क्षेत्र मिळविण्यासाठी विकासक या योजनेचा वापर करुन घेत असणे, ठाणे, जिल्ह्यातील ७ महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, नागपूर शहरातील सिव्हील लाईनचा परिसर वगळता अन्य भागात असलेले खराब रस्ते व पायाभूत सुविधांचा अभाव, पुणे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी, पार्कींगची समस्या, मेट्रो सुरू करण्याची केलेली घोषणा, काही प्रमुख भागात जनतेच्या मागणीनुसार रस्ता रुंदी रद्द न करणे, जुन्या वाड्यांचा पुनर्विकासाचा प्रलंबित असलेला प्रश्न, राज्य शासनाने पुणे शहरातील मेट्रोलगत जाहिर केलेल्या वाढीव चटई क्षेत्राचे होणारे दुरगामी दुष्परिणाम, डंम्पिग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या, औरंगाबाद शहरासाठी करावयाची समान्तर जलवाहिनी योजना कार्यान्वित न होणे, नारेगाव कचरा डेपोचा प्रलंबित प्रश्न, औरंगाबाद शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था व महापालिकेत नव्याने समाविष्ट केलेल्या गावांचा निधीअभावी विकास न होणे, राज्यातील पर्यटन क्षेत्रात साईन बोर्ड नसल्यामुळे पर्यटकांना होणारा त्रास, एकूणच राज्यातील नागरी क्षेत्रात सर्वच पायाभूत सुविधांचा अभाव असताना राज्य शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शहराच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यास होत असलेली दिरंगाई, त्यामुळे नागरीभागात विकासाचा उडालेला बोजवारा, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(ग)** **सर्वश्री.धनंजय मुंडे,** शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प.**

**नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"सर्वसामान्यांना मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाच्या बदल्यात विकासकाने म्हाडाला अधिमुल्याऐवजी गृहसाठा द्यावा अशी दुरुस्ती करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्या नविन गृहनिर्माण धोरणात विकासकाकडून गृहसाठ्याऐवजी पैसे घेण्याची तरतूद करण्यात येणे, शासकीय जमिनीवरील झोपड्यांना एस.आर.ए. अंतर्गत भाडेपट्टा उपलब्ध करुन जागा मालकी तत्वावर देणे, संक्रमण शिबिरात अनधिकृत घुसखोरी केलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना रेडी रेकनर दरानुसार किंवा पंतप्रधान आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात येणे, एफ.एस.आय.ची खैरात वाटून पायाभूत सुविधेवरील ताण वाढणे, विकासकाकडून विनामुल्य प्राप्त होणाऱ्या पाच हजार सदनिका अद्याप म्हाडाला प्राप्त झालेल्या नसणे, शासनाचे गृहनिर्माण धोरण बिल्डरांच्या सभेत विभागाला थांगपत्ता लागू न देता जाहीर करण्यात येणे, स्थावर मालमत्ता कायद्याच्या अंमलबजावणी करीता होत असलेला विलंब, तसेच राज्यातील निवासी डॉक्टरांवर सातत्याने हल्ले होणे, त्यात डॉक्टरांना गंभीर इजा पोहचणे, वाढत्या हल्ल्यांमुळे डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, सुरक्षेच्या मागण्यांसाठी राज्यातील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलनाच्या माध्यमातून संप सुरू करणे, संपामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प होणे, उपचाराअभावी रुग्णांचे अतोनात हाल होणे, गंभीर आजारी रुग्णांना प्राण गमवावे लागणे, मा. उच्च न्यायालयानेही संपाची गंभीर दखल घेऊन रुजू न होणाऱ्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याचा इशारा देणे, मा.न्यायालयाच्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर "मार्ड" ने संपापासून स्वत:ला वेगळे करणे, न्यायालयाच्या आदेशानंतर, तसेच प्रशासनाने नोटीस बजावूनही डॉक्टर रुजू न होणे, यामुळे राज्यातील रुग्णांच्या जिविताला धोका निर्माण होणे, निवासी डॉक्टरांच्या संपावर तातडीने तोडगा काढून कायमस्वरुपी, परिणामकारक तोडगा शोधणे आवश्यक असणे, तसेच म्हैसाळ (जि.सांगली) येथेही डॉ.खिद्रापुरे यांच्या क्लिनिकमध्ये अनेक गर्भपात केलेले असणे, गर्भलिंग निदान करुन स्त्री-भ्रूणाची हत्या करणे, गर्भपातासाठी मिसोप्राससारख्या गोळ्या वापरलेल्या असणे, ही औषधे मुंबईतून अवैधरित्या दलालाकडून खरेदी केलेली असणे, या गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेकजणांचा सहभाग असल्याचे उघडकीस येणे, याप्रकरणी जलदगतीने तपास करणे आवश्यक असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्यातील डॉक्टरांना संरक्षणाबरोबरच रुग्णांनाही रुग्णसेवा देणे गरजेचे असणे, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक असणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील झोपडी धारकांना दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(घ) **डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, आर्कि. अनंतराव गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, रामराव वडकुते, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

"राज्य शासनाने मोठा गाजावाजा करुन मेक ईन इंडिया व मेक इन महाराष्ट्राची घोषणा केलेली असली तरीही सद्य:स्थितीत राज्यात उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आलेली मंदी, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगांव, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी जिल्ह्यासह सर्व औद्योगिक शहरातील बंद पडलेले उद्योग, उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पूर्वी आर्थिक फायदे घेतलेले असणे, परंतु आज त्या जागेवर वर्षानुवर्षे बंद असलेले उद्योग, या हजारो बंद उद्योगांकडे राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे कोट्यावधी रुपयांचे थकीत असलेले कर्ज, कर्ज देणाऱ्या बँकांना अशा बंद उद्योगांच्या प्लॉटवर शासनाच्या नियमामुळे कारवाई करणे शक्य नसल्यामुळे नवीन उद्योगासाठी प्लॉट उपलब्ध करता न येणे, त्यामुळे उद्योगधंद्यांची वाढ थांबणे, परिणामी अनेक उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होणे, नवीन उद्योग निर्माण न झाल्यामुळे ओढवलेली बेरोजगारी, सेस खाली २ हजार एक जमीन घेण्यात येणे, परंतु त्यावर उद्योग निर्मिती करण्यास शासनाची असलेली उदासिनता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने जमीन मंजूर केल्यानंतर उद्योग घटकास देकार पत्र देण्यास अवाजवी कालावधी लागणे, त्यामुळे शासकीय धोरणाबद्दल संभ्रम व निराशेचे वातावरण पसरणे, गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी संपर्क साधून सर्व मंजूऱ्या मिळवून देण्यासाठी मैत्री कक्ष स्थापन करणे, सदर कक्षांकडून कोणतेही सकारात्मक काम न होणे, फक्त आलेल्या तक्रारीचे निरसन करण्यात येत असणे, त्यामुळे मैत्री कक्ष स्थापनेमागील हेतू निष्फळ ठरणे, विविध परवानग्यासाठी उद्योजकांचा छळ होणे, अशा परवानग्या घेत असताना मोठ्या प्रमाणात लाचखोरी होत असल्याचे उघड होणे, उद्योगासाठी वीजेच्या दरात सवलतीमध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये दुजाभाव करण्यात येणे, तसेच सातत्याने वाढणारे विजेचे दर उद्योग क्षेत्रातील मंदीमुळे व नोटाबंदीमुळे अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांवर परिणाम झाल्यामुळे त्यात काम करणाऱ्या कामगारांची रोजंदारी कमी केली जात असणे, किंवा त्यांना कामांवरुन कमी केले जात

असल्याने या कामगारांवर बेरोजगारीमुळे आलेली उपासमारीची पाळी, कामगार कायद्यातील त्रुटींमुळे कंत्राटी कामगारांचा प्रश्नही अनेक वर्षे प्रलंबित असणे, शासनाच्या उद्योग क्षेत्राच्या उदासिन धोरणामुळे राज्यात बिकट परिस्थिती निर्माण झाली असून अनेक उद्योग राज्यांबाहेर जात असताना याकडे राज्यशासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**अकरा : अशासकीय ठराव :-**

**(शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित अशासकीय ठराव)** —

(१) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८६ — (मंत्र्यांचे उत्तर)-**

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकांसारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तिला रोजगार मिळविण्याच्यादृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**(बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले अशासकीय ठराव )** -

(२) **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८४**

"राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरीक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही

विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३) **श्री. ख्वाजा बेग, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ८७**

"पावसाळ्यातील पाण्याची अनियमितता, निसर्गाचा लहरीपणा, त्यामुळे निर्माण होणारी भिषण पाणीटंचाई परिणामी पिण्याच्या पाण्यासाठी सुध्दा होणारी भटकंती ही अतिशय गंभीर बाब झाली असून त्यावर जलतज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून वेगवेगळे उपाययोजना करणे, उदा. रेन वॉटर हार्वेस्टींग, परंतु याबद्दलची अंमलबजावणी होताना दिसत नसणे, महाराष्ट्रातील सर्व शासकिय इमारतींच्या छतावर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे एकत्रीकरण (रेन वॉटर हार्वेस्टींग) करुन त्याचे इमारतीच्या आवारातील जमिनीत पाण्याच्या स्त्रोताजवळ पुनर्भरण करण्यात यावे, यामुळे जलस्त्रोत रिचार्ज होईल. परिणामी, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल. यासाठी कठोर निर्देश द्यावेत, तसेच खाजगी नवीन इमारत बांधकाम करीत असताना बांधकाम परवाना देण्यासाठी इतर बाबी तपासण्यात येतात त्याचप्रमाणे (ग्रामपंचायत ते महानगरपालिका) त्या इमारतीवरील छताचे पाणी त्या आवारातील जलस्त्रोतात सोडण्याचे नियोजनाबाबत केलेली तरतूद तपासूनच बांधकाम परवाना द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(४) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स यांचा ठराव क्रमांक १६**

"राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्राची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगाराची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

## राष्ट्रगीत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ६ एप्रिल, २०१७.**

**उत्तमसिंग चव्हाण,**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**